# सुरक्षित रक्तपुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रभावी पाऊल

# नॅट (NAT) म्हणजे (न्यूक्लिक ॲसिड टेस्ट) सर्वाधिक सुरक्षित रक्तपुरवठा करण्याकरिता जागतिक दर्जाचे प्रभावी तंत्रज्ञान.

रक्त व रक्तघटक रक्तपेढीतून रूग्णाला देताना एच.आय.व्ही, हीपॅटायटीस-बी, हीपॅटायटीस-सी,गुप्तरोग,मलेरिया,ई.चे रोगजंतु त्यात नसल्याची खात्री केली जाते. प्रचलित Elisa तंत्रानुसार या रोगजंतूंसाठी चाचण्या रोगांच्या प्रती जैविकांचे (Anti bodies) अस्तित्वानुसार आधारित असतात व त्यानुसार“विंडो पिरीयड” हा कालावधी महत्वाचा असतो. हा कालावधी जेवढा कमी तेवढी दिल्या जाणाऱ्या रक्तातून संसर्गाची शक्यता कमी असते. **NAT** या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्रतीजैविका ऐवजी रक्तातील रोगजंतूंची संक्रमित जनुके (DNA-RNA) शोधून काढली जातात व संसर्गाच्या अगदी सुरुवातीच्या काळातील ही जंतूंचे अस्तित्व अचूकपणे शोधता येते व विंडो पिरीएड कालावधी कमी होतो. त्यामुळे रक्ताची सुरक्षितता अधिक लवकर समजून येते व रक्त अधिक सुरक्षित बनते.

खानदेशात इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव संचलित रक्तपेढीत Fully Automated मशीन द्वारा नॅट टेस्टिंगची सुविधा उपलब्ध झाली आहे. तत्कालीन मा.जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष श्री. किशोरराजे निंबाळकर यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे 1 जानेवारी 2019 रोजी नॅट तंत्रज्ञान रेडक्रॉस रक्तपेढीत कार्यान्वित झाले.

1 जानेवारी 2019 ते 31 डिसेम्बर 2020 पर्यंतचा नॅट तपासणीचा अहवाल खालीलप्रमाणे

| महिना | एलायझ़ा टेस्टिंग २०१९ | नॅट टेस्टिंग २०१९ | नॅट +(Yield) संख्या २०१९ | एलायझ़ा टेस्टिंग २०२० | नॅट टेस्टिंग २०२० | नॅट +(Yield) संख्या वर्ष -२०२० | एकूण नॅट +(Yield) संख्या २०१९-२०२० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | 858 | 152 | 0 | 841 | 371 | 0 | 0 |
| फेब्रुवारी | 917 | 203 | 0 | 845 | 321 | 01 | 01 |
| मार्च | 753 | 125 | 0 | 651 | 193 | 0 | 0 |
| एप्रिल | 933 | 171 | 0 | 419 | 109 | 0 | 0 |
| मे | 1308 | 395 | 01 | 583 | 202 | 0 | 01 |
| जून | 1214 | 209 | 0 | 632 | 258 | 01 | 01 |
| जुलै | 847 | 281 | 01 | 303 | 77 | 01 | 02 |
| ऑगस्ट | 939 | 444 | 0 | 593 | 163 | 0 | 0 |
| सप्टेंबर | 1028 | 336 | 0 | 447 | 114 | 0 | 0 |
| ऑक्टोंबर | 960 | 258 | 01 | 834 | 237 | 0 | 01 |
| नोव्हेंबर | 593 | 182 | 0 | 620 | 163 | 0 | 0 |
| डिसेंबर | 939 | 235 | 0 | 821 | 227 | 0 | 0 |
| एकूण | 11289 | 2991 | 03 | 7589 | 2435 | 03 | 06 |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, आत्तापर्यंत केलेल्या नॅट तंत्रज्ञान तपासणी दरम्यान 6 रक्तदात्यांची तपासणी positive आली. म्हणजेच रक्तघटकानुसार पाहिल्यास 24 (6x4) रुग्णच नाही तर त्यांचे परिवार ही आपण सुरक्षित करू शकलो, याचे समाधान आहे. पण मनाला ही खंत पण जाणवते की नॅट टेस्टेड न केलेल्या 13452 रक्त व रक्तघटकातून अंदाजे 72 रुग्णांना विषाणूंचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अहवालानुसार आपण 30 % नॅट रक्त व रक्तघटकाचे वितरण केले आहे पण हे प्रमाण 100% पर्यन्त पोहोचविणे आपले नैतिक कर्तव्य आहे. या तंत्रज्ञानाची कन्सलटट डॉक्टर्सना विनंती करून माहिती संपूर्ण जिल्हयात पोहोचविण्याचे कार्य सर्वांच्या सहकार्याने शक्य होणार आहे. जेणेकरून अनेक परिवारांना सुरक्षित करणे शक्य होईल.

डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी (एम.डी.पॅथ.)
चेअरमन, रेडक्रॉस रक्तकेंद्र

1 जानेवारी 2019 ते 31 डिसेम्बर 2020 पर्यतचा नॅट तपासणीचा अहवाल खालीलप्रमाणे

| महिना | एलायझा टेस्टिंग २०१९ | नॅट टेस्टिंग २०१९ | नॅट +(Yield) संख्या २०१९ | एलायझा टेस्टिंग २०२० | नॅट टेस्टिंग २०२० | नॅट +(Yield) संख्या वर्ष -२०२० | एकूण नॅट +(Yield) संख्या २०१९-२०२० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | 858 | 152 | 0 | 841 | 371 | 0 | 0 |
| फेब्रुवारी | 917 | 203 | 0 | 845 | 321 | 01 | 01 |
| मार्च | 753 | 125 | 0 | 651 | 193 | 0 | 0 |
| एप्रिल | 933 | 171 | 0 | 419 | 109 | 0 | 0 |
| मे | 1308 | 395 | 01 | 583 | 202 | 0 | 01 |
| जून | 1214 | 209 | 0 | 632 | 258 | 01 | 01 |
| जुलै | 847 | 281 | 01 | 303 | 77 | 01 | 02 |
| ऑगस्ट | 939 | 444 | 0 | 593 | 163 | 0 | 0 |
| सप्टेंबर | 1028 | 336 | 0 | 447 | 114 | 0 | 0 |
| ऑक्टोंबर | 960 | 258 | 01 | 834 | 237 | 0 | 01 |
| नोव्हेंबर | 593 | 182 | 0 | 620 | 163 | 0 | 0 |
| डिसेंबर | 939 | 235 | 0 | 821 | 227 | 0 | 0 |
| एकूण | 11289 | 2991 | 03 | 7589 | 2435 | 03 | 06 |